पोलीस स्टेशन, आमगांव जिल्हा-गोंदिया

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** गोंदिया **P.S.(ठाणे):** आमगांव **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0019 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/01/2019 22:00 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7, 13(1)d, 13 (2) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

स्टेशन डायरी अंमलदार पो.स्टे.आमगांव दि.

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार — **Date From (दिनांक पासून):** 30/01/2019

**Time Period (कालावधी):** पहर 4 — **Date To ( दिनांक पर्यंत):** 30/01/2019

**Time From (वेळेपासून):** 10:11 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 10:38 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 30/01/2019 **Time (वेळ):** 21:35 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 044 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/01/2019 21:35 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 12 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** मानेगांव,आमगाव

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** जयेंद्र भोजराज खंडाते

**(b) Father's Name (वडील का नाव) :** भोजराज खंडाते

**(c) Date/Year of Birth (जन्म** 1988 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

# फिर्याद

दिनांक :— ३०/०१/२०१९

मी जयेंद्र भोजराज खंडाते, वय ३१ वर्ष, व्यवसाय—मजुरी, रा. मु. दहेगाव, पो. तांडा, ता. आमगाव, जि. गोंदिया. मो. क्र. ८६९८०४५५०६.

मी वर नमुद पत्यावर माझे कुटुंबासह राहत आहे. दि.२८.०१.२०१९ रोजी पोलीस उपअधिक्षक श्री रमाकांत दत्तात्रय कोकाटे,अॅन्टी करप्शन ब्युरो, गोंदिया यांचे समक्ष लोकसेवकाविरुध्द लाच मागणी संबधाने तक्रार नोंदविली. पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझी तक्रार संगणकावर टंकलिखीत करुन त्यावर माझी सही घेतली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

" <u>तक्रार</u> लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया
दि. २८.०१.२०१९

नांव:—श्री जयेंद्र भोजराज खंडाते, वय ३१ वर्ष, व्यवसाय—मजुरी, रा. मु. दहेगाव, पो. तांडा, ता. आमगाव, जि. गोंदिया. मो. क्र. ८६९८०४५५०६

मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया येथे येवून तक्रार नोंदवितो की, वरील पत्यावर कुटूंबासह राहतो व मजुरीचे काम करतो.

मागील दोन महिन्यापुर्वी मौजा दहेगाव येथील श्री. तुरकर यांचे शेतातुन मोटारपंपची चोरी झाली होती. श्री. तुरकर यांनी त्यांची मोटारपंप चोरीची तक्रार पोलीस स्टेशन आमगाव येथे केली होती. अंदाजे दि. २८.१२.२०१८ रोजी मौजा दहेगाव येथील श्री. भैया राणे, प्यारेलाल राणे यांना या चोरीच्या गुन्हयात अटक केली होती. त्यावेळी श्री. प्यारेलाल राणे यांच्या बयानावरून सदर चोरीच्या गुन्हयात विचारपुस करण्याकरीता श्री. येरणे, पोलीस यांनी मला पो. स्टे. आमगाव येथे घेवुन गेले होते. त्यानंतर त्यांनी मला सदर चोरीच्या गुन्हयाविषयी विचारपुस करून मला सोडुन दिले. दोन—दिवसानंतर श्री. येरणे, पोलीस, पो.स्टे. आमगाव हे माझे घरी मौजा दहेगाव येथे आले. त्यावेळी श्री. येरणे, पोलीस यांनी मला म्हटले की, तुला चोरीच्या गुन्हयातुन काढले आहे, याकरीता तु मला रू. ४,०००/— दे नाहीतर तुला या चोरीच्या गुन्हयात अटक करीन. त्यावेळी मी श्री. येरणे, पोलीस यांना नाईलाजाने ठिक आहे, असे बोललो होतो. त्यांनतर पुन्हा आठ—दहा दिवसानंतर श्री. येरणे, पोलीस हे माझे घरी आले होते, माझ्याकडे पैश्याची व्यवस्था झाली नसल्याने त्यांनी मला पो.स्टे. आमगाव पर्यंत घेऊन गेले व तिथे मला पैश्याची व्यवस्था कर असे सांगुन तिथुन मला सोडुन दिले.

त्यानंतर दि. २७.०१.२०१९ रोजी सकाळी ९.०० वा सुमारास श्री. येरणे, पोलीस हे माझे घरी मौजा दहेगाव येथे आले होते. त्यावेळी माझ्याकडे पुर्वीप्रमाणेच रू. ४,०००/— ची मागणी केली. माझ्याकडे रू. ४,०००/— नसल्याने त्यांनी आपले मोटार सायकलवर बसवुन पो.स्टे. आमगावचे गेटपर्यंत घेऊन गेले. पोलीस स्टेशनच्या गेटजवळ आपल्या मोटार सायकलवरून मला उतरवुन म्हटले की, एक महिन्यापासुन तु रू. ४,०००/— ची व्यवस्था केलेली नाही, मला पैश्यासाठी फिरवत आहेस, त्यावर मी त्यांना रू. ४,०००/— खुप जास्त होतात, कमी करा साहेब अशी विनंती केली असता त्यांनी रू. ४,०००/— ऐवजी रू. ३,०००/— ची मागणी केली. आपला मो.क्र. ९५४५४२४२८४ माझ्याकडे दिला, व सायंकाळपर्यंत पैश्याची व्यवस्था करून त्यावर फोन करण्यास सांगितले, अन्यथा तुला या चोरीच्या गुन्हयात अटक करून आत टाकीन, असे म्हटले. त्यावर मी त्यांना नाईलाजाने ठिक आहे असे बोलुन निघुन आलो.

जयेन्द्र
30/1/2019

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | दहेगांव,आमगाव,आमगांव,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | दहेगांव,आमगाव,आमगांव,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** कष्टकरी

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-8698045506

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | भुमेस्वर देबीलाल येरणे | | वडील का नाम : देबीलाल येरणे | 1. कु-हाडी,गोरेगांव,आमगांव,गोंदिया, महाराष्ट्र,भारत |
| 2 | नितीन ईस्वरदास तिरपुडे | | वडील का नाम : ईस्वरदास तिरपुडे | 1. मानेगांव,आमगाव,आमगांव,गोंदिया, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

प्रकरण अशा प्रकारे आहे की, वर नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र.1यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन मोटार पंप चोरीच्या गुन्ह्यात तक्रारदार यांना अटक करण्याची भिती दाखवुन अटक न करण्याकरीता तक्रारदारकडे रुपये 3000/-रु लाच रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम आरोपी क्र.2 याचे हस्ते त्याचे राहते घरी मौजा-मानेगांव,पोष्ट -ठाणा ता. आमगाव जि. गोंदिया येथे स्विकारली असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा नोंद करुन तपासात घेतला.

13.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Umesh Mohanrao Patil(I (Inspector)) / **or**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे** **Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार**

गै.अ. श्री. येरणे, पोलीस, पोलीस स्टेशन आमगाव, जि. गोंदिया यांनी मला चोरीच्या गुन्हयात अटक न करण्याकरीता माझ्याकडे रू. ३०००/— लाचेची मागणी केली आहे. माझ्याकडे मागणी केलेली रू. ३,०००/— लाच रक्कम त्यांना देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने गै.अ. श्री. येरणे, पोलीस यांचे विरुध्द कार्यवाही करण्याकरीता मी स्वेच्छेने तक्रार देत आहे. त्यांचेशी माझे पुर्वीचे कोणतेही आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार किंवा वैमनस्य नाही. तरी त्यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. मला चांगल्याप्रकारे लिहता वाचता येत नाही, परंतु मला माझ्या नावाची सही करता येते.

माझी तक्रार मला वाचुन दाखविली. माझ्या सांगण्याप्रमाणे टंकलिखीत केलेली असुन बरोबर आहे.''

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी दोन शासकिय पंचांना पाचाराण करुन त्यांची ओळख करुन दिली. श्री कोकाटे यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांचे सुचनेवरुन सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली व तद्नंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी माझ्याकडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रु. ३,०००/— (रु. २०००/— दराच्या १ व रु. ५००/— दराच्या २ चलनी नोटा) घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांना ॲंथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे गुणधर्म व प्रात्येक्षिक करुन दाखविले. तद्नंतर लाचेच्या रकमेस ॲंथ्रासीन पावडर लावली. तसेच व्हाईस रेकॉर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहीती दिली.

सापळा कार्यवाही दिनांक २९/०१/२०१९ रोजी सर्वानुमते ठरवुन मला घरी जाण्यास सांगुन दिनांक २९/०१/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता दहेगाव गावाच्या पलीकडे मॅग्नीज खान खुर्शीपार जवळ भेटण्यास सांगीतले. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पंचनामा क्र. १ मध्ये घेतल्या आहेत.

दिनांक २९/०१/२०१९ रोजी मी १०.०० वाजता दहेगाव गावाच्या पलीकडे मॅग्नीज खान खुर्शीपार जवळ हजर आलो. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डर द्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे वेळ १०.२७ वाजता व्हाईस रेकॉर्डर सुरु करण्यात आला. त्यानंतर वेळ १०.२९ वा श्री. येरणे, पोलीस, पोलीस स्टेशन आमगाव यांचे मोबाईल फोन क्रमांक ९५४५४२४२८४ वर माझे मोबाईल फोन क्र.८६९८०४५५०६ वरुन फोन लावला असता त्यांनी फोम उचलला नाही. थोड्यावेळाने मोबाईल क्र. ८२०८८१४९८१ वरुन माझे मोबाईल फोन क्रमांक ८६९८०४५५०६ वर फोन आला. त्यावेळी मी मोबाईल फोनचा स्पिकर ऑन करुन पंचासमक्ष बोलणी केली असता येरणे, पोलीस यांनी मला मोटारपंप चोरीच्या दाखल गुन्हयात अटक करण्याचा भिती दाखवुन माझेकडे रु ३,०००/— लाचेची मागणी केली. मी येरणे, पोलीस यांना सद्या माझ्याकडे २,०००/— रुपये आहेत, ३,०००/—रुपयाची व्यवस्था करुन देतो असे बोललो. त्यानंतर वेळ १०.४५ वा पंच क्रमांक १ च्या आवाजात व्हाईस रेकार्डर बंद केला.

30/1/2019

पोलीस स्टेशन, आमगांव ★ गोंदिया ★

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

30/11/2019

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): Umesh Mohanrao Patil
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

(NPC Pralhad Shende/2115)

स्टेशन डायरी अंमलदार
पो.स्टे.आमगांव
दि. 30/11/019

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकुण लोकसेवक येरणे पोलीस यांनी मला चोरीच्या गुन्हयात अटक करण्याची भिती दाखवुन अटक न करण्याकरीता माझ्याकडे रु ३,०००/— लाचेची मागणी केल्याची खात्री केली. त्यावरुन येरणे, पोलीस यांचेविरुध्द पुढील सापळा दिनांक ३०.०१.२०१९ रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. पोलीस उपअधिक्षक, श्री कोकाटे यांनी मला घरी जाण्यास सांगुन दिनांक ३०/०१/२०१९ रोजी सकाळी ०९.०० वाजता दहेगाव गावाच्या पलीकडे मॅग्नीज खान खुर्शीपार जवळ भेटण्यास सांगीतले. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पंचनामा क्र. २ मध्ये घेतल्या आहेत.

पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांचे सांगीतलेप्रमाणे आज दिनांक ३०/०१/२०१९ रोजी सकाळी ०९.०० वा दहेगाव गावाच्या पलीकडे मॅग्नीज खान खुर्शीपार जवळ हजर आलो. त्यावेळी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी मला लोकसेवक यांनी लाचेच्या मागणी केली असुन आज रोजी सापळा कारवाई करावयाची आहे असे पंचासमक्ष सांगीतले. त्याप्रमाणे सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. तसेच लोकसेवक यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीचे मार्फतीने लाच रक्कम स्विकारल्यावर फुलपॅन्टच्या खिश्यातुन हातरुमाल काढुन चेहरा पुसुन इशारा करण्यास मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहात पकडतील असे सांगीतले.

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पंचासमक्ष सापळा रचण्यात येणार असल्याचे सांगुन सापळा दरम्यानचे संभाषण व्हाईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर अँथ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम रु ३,०००/— माझे फुलपॅन्टचे खिश्यात ठेवण्यात आली. त्याप्रमाणे श्री. येरणे, पोलीस यांचे ठिकाण जाणुन घेण्याकरीता श्री. येरणे, पोलीस यांना फोन द्वारे संपर्क करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर वेळ ०९.४५ वाजता व्हाईस रेकॉर्डर सुरु करण्यात आला. त्यानंतर वेळ १०.०२ वाजता श्री. येरणे, पोलीस यांचे मोबाईल फोन क्र. ९५४५४२४२८४ वर माझे मोबाईल फोन क्र. ८६९८०४५५०६ वरुन फोन लावण्यात आला असता श्री. येरणे, पोलीस यांनी माझेकडे पुनश्:च रु ३,०००/— लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम गोंदिया येथे घेवुन येण्यास सांगीतले. त्यानंतर वेळ १०.०३ वा पंच क्रमांक १ च्या आवाजात व्हाईस रेकार्डर बंद केला. पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पुढील सापळा गोंदिया येथे जावुन करण्याचे ठरविले.

दरम्यान १०.०९ वाजता श्री. येरणे, पोलीस यांचे मोबाईल क्रमांक ८२०८८१४९८१ वरुन माझे मोबाईल क्रमांक ८६९८०४५५०६ वर कॉल आला. परंतु व्हाईस रेकॉर्डर बंद असल्यामुळे फोन उचलला नाही. त्यानंतर पंच क्र. १ यांचे आवाजात व्हाईस रेकॉर्डर १०.११ वा सुरु करण्यात आला. त्यानंतर वेळ १०.१३ वा श्री. येरणे, पोलीस यांचे मोबाईल फोन क्र. ८२०८८१४९८१ वर माझे मोबाईल फोन क्र.८६९८०४५५०६ वरुन मोबाईल फोनचा स्पिकर ऑन करुन फोन लावला असता श्री. येरणे, पोलीस यांनी फोनवर लाच रक्कम रु. ३,०००/— मानेगाव येथील तिरपुडे यांना देण्यास सांगीतले. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पंचासमक्ष सापळा कारवाई तिरपुडे राहत असलेल्या मानेगाव येथील घरी जावुन करण्याचे ठरविले.

जयं.श्र
30/1/2019

पोलीस स्टेशन, आमगांव जिल्हा-गोंदिया

**Attachment to Item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**

त्यानंतर सुरु असलेला व्हाईस रेकॉर्डर पिशवीत टाकुन माझ्या गळ्यात लटकवुन मला पंच क्रमांक १ यांचेसह माझे मोटार सायकलने मानेगाव येथील तिरपुडेच्या घरी जाण्यास रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागो--माग आले. त्यानंतर मी व पंच क्र. १ मानेगाव येथील तिरपुडेच्या घरी गेलो. त्याठिकाणी तिरपुडे हे हजर होते. येरणे, पोलीस यांनी रु. ३,०००/— आपल्याकडे देण्यास सांगीतले आहे, असे बोलुन श्री. येरणे, पोलीस यांना त्यांचे मोबाईल फोन क्रमांक. ८२०८८१४९८१ वर माझे मोबाईल फोन क्रमांक.८६९८०४५५०६ वरुन माझे मोबाईल फोनचा स्पिकर ऑन करुन तिरपुडे यांची येरणे, पोलीस यांचेशी बोलणी करुन दिली. त्यावेळी श्री. येरणे, पोलीस यांनी तिरपुडे यांना रु. ३,०००/— माझ्याकडुन घेण्यास सांगीतले. त्यावरुन लाचेच्या रकमेस अॅंथ्रासीन पावडर लावलेल्या रु ३,०००/— नोटा माझे फुलपॅन्टचे उजव्या खिश्यातुन काढुन मी तिरपुडे यांना दिले. तिरपुडे यांनी श्री. येरणे, पोलीस यांचे सांगीतलेवरुन रु ३,०००/— माझेकडुन स्विकारुन आपल्या फुलपॅटंच्या समोरील डाव्या खिश्यात ठेवली. त्यानंतर मी सापळा पथकास माझे फुलपॅन्टचे खिश्यातुन हातरुमाल काढुन चेहरा पुसुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने तिरपुडे यांना रंगेहात पकडले. त्यानंतर वेळ १०.३८ वा पंच क्रमांक १ च्या आवाजात व्हाईस रेकार्डर बंद केला. त्यानंतर सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पंचनामा क्र. ३ मध्ये घेतल्या आहेत.

तरी लोकसेवक भुमेश्वर देबिलाल येरणे, वय ३४ वर्ष, पोलीस शिपाई, बक्कल नंबर २१५९, पोलीस स्टेशन, आमगांव जि. गोंदिया यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून मोटारपंप चोरीच्या गुन्हयात मला अटक करण्याची भीती दाखवुन अटक न करण्याकरीता माझ्याकडे रू. ३०००/— लाच रकमेची मागणी करून ती लाच रक्कम नितीन ईश्वरदास तिरपुडे, वय २४ वर्ष, मु. मानेगांव पो. ठाणा ता. आमगांव जि. गोंदिया (खाजगी ईसम) यांचे मार्फतीने माझ्याकडुन स्विकारली म्हणुन माझी त्याचेविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरिल फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असुनं ती मला वाचुन दाखविण्यात आली. ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोवर व खरी आहे.

येरे
30/1/2019

## General Diary Details
ठाणे दैनंदिनी तपशील

**Date** 30/01/2019 22:15 **State (राज्य):** महाराष्ट्र

**P.S. (पोलीस** आमगांव **District** गोंदिया

1. **G.D. No. (ठाणे दैनंदिनी** 045
2. **G.D. Date (ठाणे दैनंदिनी** 30/01/2019 22:15 बजे
3. **G.D. Type (ठाणे दैनंदिनी** इतर
4. **Entry for (officer) (प्रविष्टि(अधिकार्यासाठी** pralhadsukharamshende
5. **Case Type (प्रकरणाचा**
6. **G.D. Brief (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):**
   यावेळी नोंद आहे पो.स्टे अप क्र.19/2019कलम 7 13(1)(d),12लाचलुचपत प्रतीबंधक अधिनीयम1988 हा मुळ कायद्यातील कलमान्वये दाखल करण्यात आला असुन सदर मुळ कायद्यात सन -2018 मध्ये संशोधन झाले असल्याने व लाचलुचपत प्रतीबंधक (संशोधन)अधिनीयम2018 हा कायदा सध्या सि.सि.टी.एन.एस. प्रणालीवर अपलोड झाला नसल्याने सदर गुन्हा मुळ कायद्यातील कलमान्वये दाखल करण्यात आला आहे. परंतु कलम-13(1)(d),12लाचलुचपत प्रतीबंधक अधिनीयम1988 यास कलम-7(a),12लाचलुचपत प्रतीबंधक (संशोधन)अधिनीयम2018 असे समजण्यात यावे. करीता नोंद.
   13(2)
7. **Subject (विषय):**
   नोंद संशोधनअधिनीयम सि.सि.टी.एन.एस. प्रणालीवर अपलोड नसल्याने
8. **Acts & Sections (अधिनियम आणि कलम):**

| S.No.(अ. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|

स्टेशन डायरी अंमलदार
पो.स्टे.आमगांव
दि.......

**Report Printed on (अहवाल मुद्रित केलेली** 30/01/2019

**Report Printed by (द्वारे अहवाल मुद्रित केला):**
**Name** pralhad sukharam shende
**Rank (पद):** HC (Head Constable)

**Signature**
**Name** pralhad sukharam shende
**Rank (पद):** HC (Head Constable)
**No.(क्र.):** npc245

स्टेशन डायरी अंमलदार
पो.स्टे.आमगांव
दि. 30/1/019